# प्रसिध्दीपत्रक

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,
पुणे-४११००६

जा.क्र./पोउआ/वाह/ १५७५ /२०२५ पुणे दिनांक - २५/०२/२०२५

फरासखाना वाहतुक विभागाअंतर्गत महाशिवरात्री उत्सव निमीत्त पुण्येश्वर मंदिर येथे भाविकांची गर्दी होत असते. त्यामुळे सदर ठिकाणी वाहतूक सुरळीत राहणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/ सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (ए) (बी), ११६ (४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पुणे शहर, दिनांक २६/०२/२०२५ रोजी सकाळी ०६:०० ते रात्रो २४:०० वा. पुण्येश्वर रोड व अगरवाल रोड वाहतूकीकरीता बंद करून खालीलप्रमाणे बदल करीत आहे.

**फरासखाना वाहतूक विभाग, पुणे अंतर्गत**

- **पुण्येश्वर रोड व अगरवाल रोड हा वाहतूकीसाठी बंद करण्यात येत आहे.**
- **वाहतूकीसाठी खालील पर्यायी मार्गाचा वापर करावा :-**

१. कुंभारवेस चौकाकडुन फडके हौद चौकाकडे जाणाऱ्या वाहनांनी कुंभारवेस चौक – गाडगीळ पुतळा चौक – जिजामाता चौक – गणेश रोड मार्गे पुढे इच्छितस्थळी जावे.
२. सुर्या हॉस्पिटल कडुन , पवळे चौकाकडुन अगरवाल रोडने जाणाऱ्या वाहनांनी शिवाजी रोडने जिजामाता चौक डावीकडे वळुन गणेश रोड मार्गे पुढे इच्छितस्थळी जावे.
३. फडके हौदाकडुन कुंभारवेस कडे जाणाऱ्या वाहनांनी जिजामाता चौक - फुटका बुरूज - बाजीराव रोडने गाडगीळ पुतळा मार्गे पुढे इच्छितस्थळी जावे.
४. कमला नेहरू हॉस्पिटल कडुन अगरवाल रोडने जाणाऱ्या वाहनांनी दारूवाला पुल – देवजी बाबा चौक - फडके हौद मार्गे गणेश रोड मार्गे पुढे इच्छितस्थळी जावे.

( अमोल झेंडे )
पोलीस उप-आयुक्त,वाहतूक
पुणे शहर.

प्रति,

१)**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- २)**सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक** , पुणे शहर.
३)**पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
४) **प्रभारी अधिकारी फरासखाना** वाहतुक विभाग, पुणे शहर.
**५)पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी.सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

Scanned with CamScanner